## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक ४२२००३

# !! प्रकटन !!

**विषय**—माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा सन २०२२मध्ये घेण्यात येणा—या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत. . . .

**संदर्भ**— १क्र.रामं/परीक्षा—३/६५८४ दिनांक १७/११/२०२१
२क्र.रामं/परीक्षा—३/६८६१ दिनांक ०८/१२/२०२१

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, सर्व माध्यमिक नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्हयातील शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी)सन २०२२ परीक्षेची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे **SARAL Database** ऑनलाईन पध्दतीने तसेच पुनर्परिक्षार्थी, नांवनोंदणी प्रमाणपत्र (**Enrollment Certificate**) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (**Private Candidate** ) तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून **ITI** (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे (**Transfer of Credit**) घेणा—या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईन पध्दतीने दिनांक **१२/११/२०२१** ते **२०/१२/२०२१** या कालावधीत व विलंबशुल्कासह दि. **२१/१२/२०२१** ते **२८/१२/२०२१** या कालावधीत भरावयाची होती परंतु शाळांना येणा—या तांत्रिक अडचणीमुळे सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने या www-mahahsscboard.in संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील पुढीलप्रमाणे—

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे **SARAL Database** वरुन आणि पुर्नपरिक्षार्थी, नांवनोंदणी प्रमाणपत्र (**Enrollment Certificate**) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (**Private Candidate**) ,श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांची ITI(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी) आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा | माध्यमिक शाळांनी चलन **DOWNLOAD** करुन चलनाव्दारे बॅकेत शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ)नियमित शुल्कासह | **गुरुवार दि. १८/११/२०२१ ते रविवार दि.२६/१२/२०२१** | **गुरुवार दि.१८/११/२०२१ ते गुरुवार ०६/०१/२०२२** |
| ब)विलंब शुल्कासह | **सोमवार दि.२७/१२/२०२१ ते शनिवार दि.०१/०१/२०२२** | |

**माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाच्या निर्धारित वाटप केंद्रावर शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करावयाची तारीख शुक्रवार दिनांक <u>०७/०१/२०२२</u> राहील.**

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

क्र.नाविमं/माध्यमिक ब १/३७०७.
नाशिक ४२२००३
दिनांक २०/१२/२०२१
२१.